Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

कैलास दौंड यांच्या कवितेतील बदलते ग्रामीण वास्तव

जानन जाधव

मराठी विभागसिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद

- 1990 नंतरच्या ग्रामिण वितेते जी काही थोडीफार महत्त्वाची कवीमंडळी लिहू लागली, त्यात कैलास दौंड यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. कैलास दौंड ज्या शेतकरी कुटूंबात वाढले, त्या कुटूंबाची सुखदु:खे त्यांनी जवळून पाहिली, तशीच त्या परिसरातील कष्टकरी कामगारांच्या सुखदु:खाचेही जवळून दर्शन घेतले. त्याचे शेतकरी मायबाप हे भूकभाकरी भोवती फिरत होते. ते कोरडवाहू शेतकरी असल्यामुळे त्यांच्या वाट्याला हालअपेष्टा आल्या होत्या. त्यांनी फरकट आणि हेळसांड सोसून, पचवून कैलास दौंड यांचा पिंड घडत होता. त्यामुळेच त्यांच्या कवितेत शेतकऱ्यांचे तसेच शेतमजूरी करणाऱ्यांचे कर्ज, कष्ट , उपासमार, अज्ञान, शोषण यांचे दुष्टचक्र प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही. या पार्श्वभूमीवर कैलास दौंड यांच्या पहिल्या तीन काव्यसंग्रहाचा शोधनिबंधात्मक आढावा घ्यायचा आहे.

प्रस्तावना

कैलास दौंड यांचे 'ऊसाच्या कविता' (2001), 'वसाण' (2002) आणि 'भोग सरू दे उन्हाचा' (2007) असे तीन कवितासंग्रह प्रसिध्द झाले आहेत.

ऊसाच्या कविता (2001) :

'ऊसाच्या कविता' हा कैलास दौंड यांचा पहिला कवितासंग्रह 'ऊसाच्या कविता' असे या संग्रहाचे नाव असले तरी ऊस उत्पादक कास्तकारांच्या जीवनाशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्यात त्यांनी केवळ ऊसतोड कामगारांच्या भावविश्वाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी कवितेला एका नव्या भावविश्वाची ओळख करून देण्याचे श्रेय कैलास दौंड यांच्याकडे जाते. म्हणून मराठी ग्रामिण कवितेचा आढावा घेतांना कोणालाही यापुढे कैलास दौंड यांच्या सदर काव्यसंग्रहाचा उल्लेख टाळता येणार नाही.

'ऊसाच्या कविता' या संग्रहात एकूण बेचाळीस कविता असून चार-सहा कवितांचा अपवाद सोडला तर उरलेल्या सर्व कविता ऊसतोड कामगारांच्या जीवनाशीच निगडीत आहेत. "मी वारकरी आहे, पण पंढरपूरचा नाही. माझे वार डोळ्यापेक्षाही उंच वाढलेल्या वाळल्या आणि हिरव्या ऊसावर चालतात. 'कोयता हे माझे आयुध आहे. भल्या पहाटे सुरू होणाऱ्या आमच्या दिवसाला संध्याकाळची वेळच नसते". असे सांगणारा ऊसतोड कामगार हा या संग्रहाचा नायक आहे.

"दो-ा-तीन दिवसातूनी
आंघोळीच्या वेळी
अंगाला लागलेल्या पाचटाने

साज्या अंगाचीच पेटते होळी
बंड करून उठत नाही
सवय झाल्या गत..." (ऊसाच्या ...,पृ. 13)

हे त्याचे निवेदन त्याच्या कामातील सल आणि जाच व्यक्त करणारे आहे. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि अत्यावश्यक प्रापंचिक गरजासाठी 'उचल' घ्यावी लागते. 'उचल' हे एक प्रकारचे कर्जच असते. ऊस तोडणीस जाण्यापूर्वी कामगार आपली गरज भागविण्यासाठी मुकादमाकडून आगाऊ रक्कम घेत असतो, त्याला 'उचल' म्हणतात. ही 'उचल' फेडण्यासाठी थंडीची पर्वा न करता पाचटाने अंग कापत असतानाही त्याला हातात कोयता घ्यावा लागतो. अशी ही ऊसतोड कामगारांची व्यथा-कथा कवीने या संग्रहातून मांडली आहे.

ऊसतोडीच्या कामासाठी घर-दार, गाव सोडून परागंदा होणे, ऊसाच्या हंगामात राब-राब राबणे, ही कामे करीत असतांना 'आंघोळी' सारख्या किमान गरजाही भागवता न येणे, कामावरील तरण्या -ताठ्या पोरींकडे टवाळांची कामूक नजर रेंगाळत असतांना तिचा प्रतिकार करणे, मनासारखे सण-उत्सव साजरे न करता येणे, नव्या जोडप्यांना तारूण्याचे, चार दिवसांचे मनासारखे सुखही उपभोगताही न येणे, अशी ही त्यांची 'अभावग्रस्त', 'नकारात्मक' जीवनशैली दौंडांनी साध्या, विधानात्मक रचनेतून मांडली आहे. ही कविता काहीशी अनघड असली तरी तिच्यातील वेगळा आशय आपल्याला भावल्याशिवाय राहत नाही.

हे ऊसतोडणी कामगार गरीब, दरिद्री, अशिक्षित आणि एकूणच 'नाही रे' वर्गातील असतीलही; परंतू कामगारांच्या श्रमातून निर्मिती होते. म्हणून हे श्रम, उमेदीचे, आनंददायी आणि नवनिर्मिती करणारे असतात.

"माझ्या मनाची होलपट
वाळलेला पाचट
त्याची वाढलेली कूस
जळलेल्या खोड्यातून
पुन्हा फुटलेला ऊस" (ऊसाच्या...पृ.51)

अशी मनाची उभारी व्यक्त करणारी 'ऊसाच्या खोडव्या' ची प्रतिमा आपले सहज लक्ष वेधून घेते. ऊसतोडी कामगारांचे काम ऊसाच्या पिकाशी निगडीत असते. पीक कोणतेही का असेना त्याला पाण्याची गरज असते. ऊसाच्या पिकाला तर भरपूर पाणी आवश्यक असते. पाऊस पडल्याशिवाय विहीरींना नद्या--नाल्यां-ना पाणी येत नाही. स्वाभाविक पावसाची प्रतिक्षा हा ह्या कामगरांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग असतो. शिवाय एकूणच कृषीसाठी पावसाची नितांत गरज असते. म्हणून पावसाच्या आगमनाची वाट पाहणे, हा कृषिनिष्ठ ग्रामिण परिसरातील माणसाच्या भावविश्वाचा एक अपरिहार्य कोपरा असतो. 'अवर्षणाचे गाणे', 'आभाळगाणं', 'अजून पाऊस आला नाही', 'न कोसळणारा पाऊस' ह्या कवितांमधून पावासाची प्रतिक्षा आणि तो वेळेवर आला नाही तर भोगावी लागणारी शिक्षा, यासंबंधीची मानसिक घालमेल प्रकट केली आहे. पण या अस्मानी आपत्तीबरोबरच 'मुकादमा' सारख्या विखारी नजरेच्या 'ईन्सानी' अरिष्टांवरही मात करणारे; शील, सौजन्य, चारित्र्य, पत, प्रतिष्ठा जपणारे कामगार आणि त्यांचे नैतिक संवदेन असणारे भावविश्व, कैलास दौंड यांनी त्यांचा हा पहिला संग्रह असूनही प्रगल्भ भान ठेवून शब्दबध्द केले आहे.

शेवटी कैलास दौंड यांची आणखी एक कविता या ठिकाणी आवर्जून विचारात घ्यावी लागते. त्यातून त्यांचे राजकीय सत्ता आणि अर्थव्यवस्थेसंबंधीचे भान प्रकट होते. भारताच्या नभांगणात स्वातंत्र्याचा सुर्योदय होऊन त्याची सुवर्णजयंतीही साजरी झाली. पण स्वातंत्र्याचा वारा कष्टकऱ्यांचे ताप शीतल करू शकला नाही. 'तोच सूर्य नभात' या कवितेत कवीने ही फार मोठी खंत बोलून दाखविली आहे.

"तोच सूर्य नभात, तीच तीक्ष्ण दुपार
तेच दिस आज, तेच पोटात काहूर
फुलल्या होत्या मनात, स्वातंत्र्याच्या आशा
दशके किती लोटली, तेथेच त्या तशा
पव्कांनी भरले ताट, सुधारणांचे पुढे
घेती ओढूनी लांडगे, हे उपाशी बापडे
रोज पेटती येथे, ज्योती उद्घाटनाच्या
वाती नच पेटती, भितीत झोपडीच्या
सह्याद्री कुशीत, रोज गर्भार कष्टते

निस्तेज कुरूप बाळ, कर्कश ओरडते". (ऊसाच्या ..., पृ.22)

अशी ही स्वातंत्र्योत्तर सुलतानी ग्रामीण कामगारांच्या जिवांशी खेळत असते. त्यामुळे त्यांचा प्रापंचिक, शारिरीक जीवनसंघर्ष तर अधिकाधिक तीव्र होतो. त्यातून त्याची फार परवड व हेळसांड होते.

"त्या जीवांचे लग्न हे कष्टकऱ्यांना शाप
मिटल्या दुःखात हे आणखी एक माप" (ऊसाच्या...,पृ.22)

ही कविता अनेकार्थसूचक काव्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे, असे म्हणता येईल या रचनेने कामगारांच्या जीवनसंघर्षाचा आणखी एक कंकोरा व्यक्त केला आहे. त्यांचे होणारे लैंगिक शोषण आणि त्यातून व्यसनाकडे वळलेली त्यांची पाऊले यामुळे कामगारांचा जीवनसंघर्ष आणखी गुंतागुंतीचा बनतो. 'बुडत्याचे पाय डोहात' या न्यायाने त्याची शीघ्र गतीने विनाशाकडे वाटचाल सुरू असते.

अशाप्रकारे 'ऊसाच्या कविता' ऊसतोडणी कामगारांची व्यथा-कथा सांगणारी त्यांची होलपट-घुसमट मांडणारी आहे. रचनेच्या दृष्टी सदर संग्रह ढोबळ मांडणीचा, सरधोपट असला तरी त्यातील आशयाचे वेगळेपण महत्त्वाचे आहे.

वसा□ (2002) :

'वसाण' हा कैलास दौंड यांचा दुसरा संग्रह. हा बेचाळीस कवितांचा संग्रह असून शेती, शेतकरी, त्यांची सुख-दुःखे, त्यांची जीवनशैली आणि तो ज्या परिसरात वावरतो. तेथील जगरहाटी या संग्रहाच्या केंद्रस्थानी आहे. मायबाप, शेती, पाऊस, दुष्काळ, पिके, कुटूंब, सासर-माहेर, ऋतुबदल गुरेढोरे, पीकपाणी आणि एकूण कृषिनिष्ठ खेड्याच्या आसमंताचा परिघ हे कवीचे अनुभवविश्व आहे.ह्या विश्वात कवी रमतो, तेथील अनुभव जमेस घेता त्यातून काव्यनिर्मिती करतो. परंतू कवीची जीवनाकडे पाहण्याची वृत्ती गंभीर आणि दृष्टी निर्मितीशील आहे. म्हणून इंद्रजित भालेरावांना दौंडाची कविता "डोक्यावर काटेरी धस्कटांचा भारा आणि डोक्यात मात्र पिसाज्याचा मोर, असं दुहेरी परिणाम असलेली कविता वाटते". त्यांचा हा अभिप्राय सार्थ आहे, यात शंका नाही.

'वसाण' ही एक ग्रामसंज्ञा आहे. ती कृषिजीवनाशी संबंधित आहे, शेतकरी शेतात औत हाकत असतांना, विशेषतः वखर, कोळपे इ. त्याच्या लोखंडी पासेला हरळीच्या मुळ्या, जमिनीतला काडी कचरा गुंततो, त्यात हरळीच्या मुळ्या अधिक असतात. हरळीच्या मुळ्यांना 'काशा'असे म्हणतात. आपली वखरणी-कोळपणी चांगली व्हावी म्हणून शेतकरी औत उचलून औताला गुंतलेल्या 'काशा' काढतो ; त्याला 'वसाण' काढणे असे म्हणतात. शेतकऱ्यांचे जीवन हे एक औत आहे. त्यालाही निरनिराळ्या समस्या, अडीअडचणींचा गुंता होत असतो. त्यावर मात केल्याशिवाय त्याच्या जीवनाच्या औताला लटकलेले प्रश्न सोडविण्याशिवाय तो आपले काम निर्वेधपणे करू शकत नाही. शेतकऱ्याला जगण्याला वसा□ व्यक्त करण्याचा प्रयत्न या कवितांमधून केलेला आढळतो.

"तणकट्या वावरात
बाप कुळव हाकतो
□शा येचता येचता
बांधी वसाण फेकतो
... बीजा आधी जमिनीला
वहावे घामाचे दान
किती काढावे असले
आयुष्याचचे वसाण" (वसाण,पृ.5)

ह्या बापाचे रानात उन्हाचे बस्तान आहे, बापाची ढोरमेहनत आहे ; पण त्याचे दान पदरात पडेलच असे नाही. मशागत आणि लागवड कितीही चांगली झाली, वेळेवर पाऊसही आला ; तर □धी-कधी विपरीत घडते आणि पीक हातचे जाते. पीक भरात आहे, हंगाम जोरात आहे; पण ते पदरात पडेल याची खात्री नाही.

"पावसाचा नंगानाच
तीन दिसं चाललेला
बाप जोंधळ्यासारखा
धरणीशी टेकलेला

□ुण्या सटवीचा फेरा
रानारानात फिरला
माझा शेतकरी बाप
सारी जुगार हरला" (वसाण, पृ.25)

□धी अवकाळी पाऊस येतो आणि शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी होते, 'गारपिटी'मुळे तर संपूर्ण पीकच उद्ध्वस्त होते. त्याचे वर्णन करतांना कवीने फार परिणामकारक शब्दांची योजना केली आहे.

"गिधाडांचा थवा आता
मस्तकावरून उडे
तारूण्यातच फुटले
रानाचे हिरवे चुडे" (वसाण, पृ.26)

बापाची व्यथा वेदना कवीने या कवितेतून मांडली; तशीच आईची दुःखगाथाही कवीने आईसंबंधीच्या कवितेतून व्यक्त केलेली आहे. रानावनात मोळीसाठी गेलेली आई पावसाच्या माऱ्यात सापडते, तिला आपल्या घरी एकट्या असलेल्या बाळाची काळजी वाटते. अशी 'ढव्हं' ही कविता मातेच्या कष्टमय कारूण्याने ओथंबलेली आहे.

आईचे वात्सल्य आणि दारिद्रय, तिचे कष्ट आणि तिच्या हालअपेष्टा, तिचे पोशिंदेपण आणि तिचा शुश्रुषाभाव तर अनेक कवींनी शब्दांकित केला आहे. पण या संग्रहातील 'मायची कविता' तिची वेगळीच व्यथा शब्दबध्द करते. या कवितेतील बाप पुरूषी अहंकाराने प्रेरित होऊन मिळेल त्या आयुधाने आईला मारायचा. त्यातून त्याची क्रूर, अमानुष, वागणूक दिसते. माय मात्र 'माहेरी जाते' अशी धमकी देऊन मुकाट्याने मार खायाची आणि निमूटपणे काम करायची. अशी ही माय गायीसारखी गरीब होती.

"...जाते जाते म्हणून
इथंच मार □ायची...
... माय बापाचीच पथारी
चावडी देवळात
पडायला लागली की
माहेरच्या वाटा धूसर होतात
अशा कितीतरी आया
आपलं सोन्यावाणी आयुष्य
घाण्याला बांधून घेतात". (वसाण, पृ.32)

शेतकरी स्त्री घरात आणि शेतात अशा दोन ठिकाणी राबते. आहाराची आबाळ, औषधांची हेळसांड, लादलेली बाळंतपणे, जिवापाड कष्ट, पराकाष्ठेचे दारिद्रय यामुळे गांजलेली पिडलेली आई, नवरेशाहीचा जाचही सहन करते. नवऱ्याच्या मालकी हक्काला सासूही खतपाणी घालत असते. वास्तविक शेतकरी स्त्रीच्या जीवनसंघर्षाचा हा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू कैलास दौंड यांनी या संग्रहातून मांडलेला आहे. पण तरीही ही माय 'नवरा' हा तिचा 'विक पॉईंट' सोडला तर ती अत्यंत खमकी, धमक असलेली, सौर उर्जेवर चालणारी, डोकं असलेली 'पावरबाज' स्त्री आहे. ती काबाडकष्ट करणाऱ्या मुलांची अन्नपूर्णा होते, झोकांडे खात चालणाऱ्या नवऱ्याची देखभाल करणारी परिचारिका बनते आणि पोरीसाठी बाळंतपणाची माहिती घेऊन, आवश्यक ती तयारी करून 'प्रसविका' म्हणून सज्ज होते.

"सौर उर्जेवर चालणारं आईच डोकं
जिथल्या तिथं काम करणारं
'रोबोट' सारखं जगणारं
तरी आईनं हरवलेल्या नाहियेत
ती खुशाल वाहू देते
'□ोबलयझेशन' च्या युगातही
अंतरातून खळाळणारे
आदिम नितळ झरे" (वसा□, पृ.10)

'ढव्हं', 'शापित रानं', 'बोलवा', 'देशोधडी', 'नभ झाकाळले', 'राख', 'माती', 'उन्हाळा', 'काय आभाळाच्या मनी', 'अजगर', 'पावसाचे थेंब राजे', 'गारपिट' इत्यादी कवितांमधून पावसाची प्रतिक्षा, त्याचे शेतातील महत्त्व, त्याच्या न येण्याने शेतीवर, जीवसृष्टीवी पसरलेली अवकळा कवीने अतिशय प्रामाणिकपणे व्यक्त केली आहे.

अशा प्रकार 'वसाण' हा काव्यसंग्रह शेतीची अवकळा, शेतकऱ्याची दुर्दशा, शेतकरी स्त्रीची कुचंबणा साध्या-सोप्या शब्दांत मांडतो. ह्या कवितांची भाषा अलंकार प्रतिमांनी परिपूर्ण नसेल, रचना चातुर्यांच्या बाबतीत कविता साधीसुधी असेल, पण तिने कष्ट करणारा शेतकरी आपल्या गुणावगुणांसहित साकार केला आहे.

भोग सरू दे उन्हाचा

'भोग सरू दे उन्हाचा' हा कैलास दौंड यांचा तिसरा काव्यसंग्रह आहे. दौंडांनी या संग्रहात बहुतेक कवितांमधून शेतकऱ्यांचे दु:ख, कष्ट, शोषण, त्याच्या वाट्याला आलेल्या हालअपेष्टा अत्यंत पारदर्शी भाषेत, ठामपणे व्यक्त केल्या आहेत. बापाचे कष्ट कवीला गौरवास्पद, अभिमान बाळगावे असे वाटतात. हा बाप खडकाळ भुईत, दगडाच्या नशिबात रेघोट्या ओढतो. त्याची मशागत अत्यंत खडतर असते;पण तो ती मोठ्या निष्ठेने आणि ताकदीने करतो.

''रेघा-रेघा रेघोटता
भे ा-भेगात भुकटी
असे भुईशी झुंजता
जीव येतो मेटाकुटी
थोडी खडकाची माती
माती मातीला बोलवी
बीज रूजता मातीत
फुटे देहाला पालवी'' (भोग सरू दे उन्हाचा, पृ.7)

बापाचा बुलंदपणा, त्याचा करारी बाणा आणि त्याची जीवनझुंज कवीने जशी धारदार शब्दांत व्यक्त केली आहे; तशीच मायची चिकाटी, निष्ठा, तिचे वात्सल्य, तिचा त्याग नावाजताना कवी उत्कट होतो. उपाशीपोटी राहून काबाडकष्ट करणारी, फाटक्या चोळी-लुगड्यात वावरणारी, कित्येक उन्हाळे मुक्याने सोसणारी माय रेखाटताना कवी हळवा आणि व्याकूळ होतो. पण तो आपल्या वास्तवाचा तोल सोडून मायचा गौरवा करताना 'रोमँटिक' होत नाही, हे कवी दौंड यांचे बलस्थान आहे.

''माय ऊनपावसाची
माय चिखल मातीची
धुंडा कुठंबी गड्यांनो
माय एकाच जातीची

...एक बापाची वहाण
त्यानं लगनात दिली
बाकी सारी जिनगाणी
निस्ती अनवाणी गेली

रोज एकाच्या बांधाला
जाते रानात राबाया
लेकराच्या भल्यासाठी
ठुते आयुष्य झिजाया'' (भोग सरू दे उन्हाचा, पृ.78)

माय घराचे खोड असतो. नवऱ्याच्या आधारने ती लेकाच्या संसाराला फुलविण्याचा संकल्प करते. "कधी लेकाचा फुलेल", तिच्या सुवास चौफेर" अशी तिची आकांक्षा असते. त्यासाठी आपली ताकद पणाला लावते, मायची जिद्द, झुंज आणि शक्ती किती अगाध असते, याचे कवीने केलेले वर्णन बिनतोड आहे.

"वावधानी वादळात
आय पेटलेली वात
□ोल कातळी डोहात
शुभ्र पाण्याचा प्रपात" (भोग सरू दे उन्हाचा, पृ.79)

शेतकरी मायबापांचे आयुष्यभर शेतीत राबराब राबणे सुरू असते, तरीही दुःखांतून, दारिद्र्यातून त्यांची सटका होत नाही. त्यांच्या वाट्याला आलले हे पिढ्यान पिढ्याचे न संपणारे भोग आहेत. शेतकऱ्यांच्या नशिबी हे भोग येण्याचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे निसर्गाची अवकृपा होय. वेळेवर, पुरेसा पडणारा पाऊस, हा शेतीचा मूलाधार आहे. पण तो येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पाऊस पडेल, वाफसा होईल; मग पेरणी करू त्याची आस असते. त्यासाठी कोणतेही कष्ट करायला तो तयार असतो. पेरणीचा ध्यास हा शेतकऱ्यांचा श्वास असतो.

"वाऱ्या पावसाचे दिस
दिस आले पेरायचे
...बीज रूजाया ओटीत
भुरे आसुसले रान

...दुःख पाठीशी बांधुनी
फिरे रानाची तहान
भाकरीच्या ध्यासामधी
मिसळून पाची प्राण"(भोग सरू दे उन्हाचे, पृ.15)

पावसाचा कोप हा जणू नियम असतो. हवा तसा आणि तेव्हा पाऊस येणे हा जणू अपवाद ठरतो.'रोज पेर्ते व्हा', 'गुन्हा', 'शिवापल्याड पाऊस' ह्यासारख्या कवितांमधून कवीने पावासाच्या अभावामुळे शेतीची होणारी वाताहत प्रकर्षाने मांडली आहे. 'रोज पेर्तेव्हा' मध्ये कवी म्हणतो 'साऱ्या आशा नांगरीत ढग येऊन जातात, तोंड फोडोनिया माती, रोज मागतसे पाणी' अशी परिस्थिती आहे. परमेश्वराविषयीच्या निष्ठा फोल ठरल्यासारखे वाटते.

"दिंड्या पताकांना ओल
यंदा नाहीच लागली
दारापुढूनी पालखी
बघा कोरडी चालली"(भो□ सरू दे उन्हाचा,पृ.34)

या मातीत जेव्हा पाऊस पडत नाही, तेव्हा तहानलेला जीव कोरडा पडतो, तो उदास होतो आणि केविलवाणे गाणे गातो.

"मातीचे गाणे कावळा गातो
घडावे पडावे पुन्हा पुन्हा
मातीशी मग जीव पुसतो
इथे जन्मलो कोठला गुन्हा?" (भोग सरू दे उन्हाचा, पृ. 35)

'शिवापल्याड पाऊस' या कवितेत कवीने पावसाच्या आगमनाची चातक-प्रतिक्षा शब्दबध्द केली आहे. गावाला पोसण्यसाठी शिवारा अलिकडचा पाऊस धरती मागते आहे, पावसाच्या आगमनाची ओढ लागल्यामुळे शेतकरी पेरणीची तयारी करतो आहे. खत बी-बियाण्यासाठी सारे गाव बाजारात पांगले आहे.

"भोग सरू दे उन्हाचा
येवो ओलावा कुशीत
शिवाराच्या खांद्यावरी
□ळो खरीप खुशीत" (भोग सरू दे उन्हाचा, पृ. 36)

अशाप्रकारे उन्हाळ्यात पावसाची अवकाळी सर आली तर वातावरण विस्कटून जाते. एकंदरित पावसाच्या ये□याची प्रतिक्षा, त्याचे महत्त्व, त्याचा ग्रामीण जीवनावर होणार परिणाम कवीने चांगल्य प्रकारे शब्दबध्द केला आहे.

शेतकऱ्यांच्या दुःखमय, कष्टपूर्ण आयुष्याचे विविधांगी चित्रण कवीने प्रकर्षाने केले आहे. त्या संदर्भात प्रा. शिवाजी हुसे यांची प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. ते म्हणतात, "शेतकऱ्यांचे दुःख हे बहूआयामी आहे. त्याला एकच एक असा शत्रू नाही. उभं आयुष्य

राब-राब राबूनही दोन वेळच्या अन्नाला तो मोताद आहे. जगाचा पोशिंदा असणारा हा 'भूमिपुत्र' मरण यातना भोगतो आहे. सगळेच ऋतू दगाबाज. आजवी आपण व्यवस्थेला दोषी ठरवत आलो; परंतु शेतकऱ्यांची म्हटली जाणारी मुलं आज सत्तेवर आहेत. तरीहीर त्यांच्या घामाला मोल मिळत नाही, हे खरे दु:ख आहे". या संदर्भात 'दाम' या कवितेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल, 'उभा कुऱ्हाडीचा दांडा त्याल गण नाही गोत' असे सांगून कवी म्हणतो-

"राबणाऱ्या जीवनाचं
□त झालं खत
□□गलाबी दिलं तरी
वाया जातं मत" (भोग सरू दे उन्हाचा, पृ.8)

शेतकऱ्यांच्या पिकाला उत्पादन खर्चावर आधारित आणि त्याच्या श्रमाचे मोल जाणणारे बाजारभाव मिळत नाही. कष्ट-दु:□, कर्ज-दारिद्रय याचा फेरा असूनही बाजारभाव नाही. याऊलट त्याचे पिक आले की, पाखरांचे शेताकडे आणि शेतकऱ्यांचे आक्रमण सुरू होते. त्याची वाट रोखण्यासाठी, रान राखण्यासाठी आता 'उठलेल्या' हातांची गरज आहे.

"सोनं पिकलं रानात
होते बाजारात माती
सालोसाल तुह्ये कष्ट
असे केरातच जाती
तुह्या काबाड कष्टाला
-नाही मिळ□ार भाव
तुझ्या जीवनाची बोली
तूच बाजारात लाव" (भोग, पृ.9)

अशा प्रकारे कवीने शेतकऱ्यांना 'उठावा'चे प्रोत्साहन, आत्मभानाची प्रेरणा, आयुष्याच्या उन्नतीची आस यासंबंधी स्पष्टपणे जाणीव करून दिली आहे. शेतकऱ्यांच्या एकूण कष्टांच्या, घामाच्या मालाची माती जेव्हा होते; तेव्हा आता 'जागृती' व्हायला हवी. शेतकऱ्यांना शोषणाविरूध्द पेटून उठण्याची जाणीव व्हायला हवी, अशी ठाम भावना 'धूळमाती' या कवितेत कवीने व्यक्त केली आहे. कुणब्याचा माल व्यापारी योग्य भाव देऊन घेत नाही. तो विकण्यासाठीही त्याल आटापिटा करावा लागमो. त्याला लुटणाऱ्यामध्ये आता त्याचे गणगोतही सहभागी झाले आहेत.

"□ूप झाले आत खूप
नाही चालणार पाप
□ुणब्याच्या अन्नावरी
दुष्ट पोसले हे साप
□ापसाचा मऊपणा
बस्स झाला तुह्या अंगी
अशा सापाला ठेचण्या
रग राख अंगामधी " (भोग सरू दे उन्हाचा, पृ.42)

'भोग सरू दे उन्हाचा' या संग्रहात स्त्रियांच्या कष्टांची दु:खगाथाही शब्दांकित झाली आहे. आपल्या पिलांच्या ओढीने इ ोडपणाऱ्या पावसाची पर्वा न करता घराकडे येणारी माय 'ढव्हं' या कवितेत आढळते. कष्टाळू स्त्रीची प्रतिनिधित्व करणारी जनी रानात □ावऱ्या वेचते. विहिरीतून पाण्याचा 'पव्हरा' ओढण्यासाठी ताराबाईची धडपड जाणवते, 'पाण्यासाठी' बायांची सतत धावपळ आणि तारांबळ सुरू असते. 'तळी' या कवितेतील 'जाते ओढणे' हे कष्टाचे प्रतिक बनते.

"पीळ पडल्या पोटाने
घुमे ओवीसंगे खुंटा
असे निरूपाई भोग
चाला बायांनो ग लुटा" (भोग, पृ. 60)

अशी त्यांची कष्टाकडे पाहण्याची स्वागतशील आणि सकारात्मक दृष्टी दिसून येते. या संग्रहात ऊस तोडणी कामगारांच्या व्यथा-था, दु:-कष्ट, आशा-आकांक्षा सांगणाज्या काही कविता आहेत. त्याचा विचार 'ऊसाच्या कविता' या संग्रहात करण्यात आल्या आहे.

'भोग सरू दे उन्हाचा' हा संग्रह म्हणजे भूमिपुत्रांचा जाहीरनामा होय. त्यात मातीचे महत्त्व आहे, कुणब्यांची थोरवी आहे, त्यांच्या कष्टांची गाथा आहे, त्याच्या शोषणाची व्यथा आहे. त्याचे सारे नातलग भेगाळल्या भुईसारखे सगळीकडे सारखे आहेत. पीक विम्यासारख्या योजना फक्त कागदावर राबविल्या जातात आणि हितसंबंधितांचे भरणपोषण करण्यातच त्यांना धन्यता वाटते.

"पीक पाहणीचे
घेताना दाखले
पी हे ला ले ाली मंदी
दुष्काळाची झळ
पि ां-ा ला ली
भूक ती भागली योजनांची
भेटो किंवा नाही
जळाल्याचा विमा
आज खोतो खिमा कुणब्याच्या (भोग सरू दे उन्हाचा, पृ.23)

शेतकज्यांचा भावनिक, मानसिक, शारीरिक, जीवनसंघर्ष अतिशय धारदारपणे रेखाटणारी ही कविता आहे. तिच्यात कुणब्यांच्या आत्महत्त्यांचेही अनेक सूचक पण करूणाजनक संदर्भ आले आहेत.

"येत नाही येते आता
ुठल्या फुलांचा वास
श्वासांच्या फुलांभोवती
आवळत जातो फास " (भोग सरू दे उन्हाचा, पृ.23)
"शेतामंदी पीक आलं
आलं कणी-कणसाचं
भोवापायी बाभळीला
बघा मढं माणसाचा" (भोग सरू दे उन्हाचा, पृ.8)

हा शोषित-पिडीत शेतकरी प्राथ्रना करतो; ढेकळांची व्यंकटी सांडो, व्यवस्थेला सत्कर्माचे स्वप्न पडो, वावरातल्या धान्याचे तिमिर जावो; परंतु दुर्दैवाने असे काही होत नाही. त्याच्या वाट्याला वंचना येते आणि मग शेवटी आपली 'प्रार्थना' दयाघनापर्यंत पोहचविण्यासाठी त्याला झाडालाच लटकावे लागते. शेतकज्यांचे हे ह्दयद्रावक वास्तव कैलास दौंड अत्यंत प्रभावी शैलीत व्यक्त करतात. पण त्याचबरोबर त्यांची कविता ही जागृतीचा, उठावाचा आणि प्रतिशोधाचाही संदेश देते. 'अंश' या कवितेते ते म्हणतात-

"बांधाआत पिकवत जा शेती
तुला वाटेल ती काढत जा पिकं
पण बांधावर चार दोन ठिकाणी
नागांचीही पैदास र
जे करतील दलालांना कडकडून दंश
असे काही अंश पिकवायलाच हवेत" (भोग सरू दे उन्हाचा, पृ.80)

अशा प्रकारे कैलास दौंड यांचा काव्यसंग्रह शेतकज्यांचा जीवनसंघर्ष चपखल शब्दयोजना, ओघवते निवदे-न, समर्प शब्द ळा यांनी नटलेला आहे.

"माती मधूनच होतो
जन्म साज्या जगताचा
माती खाऊन वाढतो
वंश फक्त कुणब्याचा" (भोग सरू दे उन्हाचा, पृ.17)

अशी मातीची महती गाणारा, कुणब्याची थोरवी सांगणारा, त्याचा जीवनसंघर्ष शिल्पांकित करणारा एक जबरदस्त काव्यसंग्रह आहे. "ग्रामिण जीवनातील भाऊबंदकी, त्यातून होणारा संघर्ष, सतत पडणारा दुष्काळ, वाढती महागाई, मातीमोल भाव, नातेवाईकांचा मतलबीपणा, सर्व बाजूंनी झालेली कोंडी शेतीमध्ये झालेल्या यंत्राचा प्रवेश, कृषिजीवनाची होणारी वाताहत, कर्जबारीपणा, पाऊसपाण्याचे बदलते संदर्भ, फसवे नेते, त्यातूनच वाट्याला आलेले कंगालपण हे कवी कैलास दौंड यांच्या कवितेचे आस्थाविषय आहेत. ज्या शेतकरी कुटूंबात ते वाढले, त्या शेतकरी मायबापाच्या ढासाळत जाणाज्या जगण्याचे, भूक आणि भाकरीभोवती फिरत, फरफटत जगणाज्या □ारडवाहू शेतकज्यांचे आणि एकूणच बदलते ग्रामीण कृषी जीवनाचे वास्तव मोठ्या प्रखरतेने आणि परखंडपणे मांडणारी ही कविता आहे... मातीश नाळ जोडून लेखन करणारा कैलास दोंड हा कवी आपल्या भूमिकेशी प्रामाणिक असल्याचे जाणवते. चिंतनाच्या पातळीवर जाऊन बदलत्या ग्रामीण जीवानानुभवाचा वास्तव अविष्काी घडविणारी ही कविता आहे". तेच तिचे सामर्थ्य आहे, यात शंका नाही.

संदर्भ :

1) इंद्रजित भालेराव, मलपृष्ठावरील अभिप्राय, वसाण, कैलास दौंड, चंद्रमोळी प्र□ाश-न, पु□. प्रथम प्र□ाश-न 2002.
2) डॉ. कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर 1999.
3) डॉ. सौ. हेमलता गायकवाड, आधुनिक मराठी ग्रामीण कविता, फडके प्रकाशन, □ोल्हापूर, 1 ली आवृत्ती, 1997.
4) प्रा.शिवाजी हुसे, बदलते ग्रामीण वास्तव, भोग सरू दे उन्हाचा, दै. प्रभात, पुणे. दि. 9/12/2007.